सकाळ
सातारा, शनिवार, १५ ऑक्टोबर २०१६
५

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव



**कोरेगाव : यशस्वी खेळाडूंसमवेत डॉ. पतंगराव कदम, डॉ. अनिल पाटील, डॉ. विजयसिंह सावंत आदी.**

# डी. पी. भोसले महाविद्यालयाला विजेतेपद

**कोरेगाव, ता. १४ :** सातारा येथे झालेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपद मिळवून सर्वाधिक क्रीडा प्रकारांमध्ये सलग दुसऱ्या वर्षी अव्वल स्थान राखले. मुलींच्या संघाने रिले स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवले. त्याचबरोबर १०० व ४०० मीटर धावणे, पोल वॉल्ट, लांब व तिहेरी उडी व भालफेकमध्ये स्पर्धकांनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवले. विजेत्यांमध्ये विजय जाधव, शुभम देशमुख, सोनल कदम, गायत्री साबळे, कीर्ती शिर्के यांचा समावेश आहे. त्यांना प्रा. बाळकृष्ण भोसले, प्रा. अरुण पाटील, किशोर अनभुले यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाने मिळवलेल्या या यशाबद्दल स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. पतंगराव कदम, रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, सहसचिव प्राचार्य डॉ. डी. डी. पाटील, डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी अभिनंदन केले.